**प्रेस नोट दि.०८/११/२०२३**

**गुन्हे शाखा, युनिट -५ पिंपरी चिंचवड यांची उल्लेखनीय कामगिरी**

**तळेगाव दाभाडे येथील तरुणाचे निर्घुणपणे झालेला खुनाचा गुन्हा उलडकीस आणुन एक आरोपीस घेतले शिताफीने ताब्यात**

तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन हद्दीत दि.०५/११/२०२३ रोजी २०.१५ वा.चे सुमारास जुना मुंबई पुणे हायवे रोडलगत निलया सोसायटी जवळील भंगाराच्या दुकाना जवळ इसम नामे कृष्णा कैलास शेळके रा. राऊतवाडी, करुंज, पवना नगर ता. मावळ जि. पुणे यास अनोळखी ०४ इसमांनी लाथा-बुक्याने व चाकुने मारहान करुन जिवे मारुन घटनास्थळावरुन आरोपी फरार झाले होते. सदर बाबत **तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन, ५६८/२०२३ भा.द.वि.क. ३०२,३२३,३४ अन्वये** दाखल झाला होता सदर गुन्ह्याचा समांतर तपास मा.वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे व सुचनाप्रमाणे श्री अजित लकडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा युनिट-५ पिं.चिं. यांचे मार्गदर्शनाखाली पोउप-नि राहुल कोळी, पोहवा/७१८ बनसुडे, पोहवा/८५८ राठोड, पोहवा/९७६ बहीरट, पोहवा/१००९ ठाकरे, पोहवा/१६०८ मालुसरे, पोहवा/१५५५ सुर्यवंशी,पोना/१९०० शेख, पोना/१२९८ गोनटे, पोशि/१३०३ इघारे, पोशि/१३०५ खेडकर, पोशि/४९९ माने, पोशि/१८९८ गाडेकर, पोशि/२०१७ भोसले, पोशि/२१९२ ब्रम्हांदे, पोशि/२५७१ गुट्टे असे पोलीस पथक करित होते. घटना रात्रीचे वेळी घडली असल्याने घटनास्थळावर अंधार होता तसेच आरोपी घटनेनंतर अंधारात पळून गेल्याने आरोपीचा माग काढणे व आरोपींची माहिती मिळणे अवघड झाले होते.

गुन्हे शाखा युनिट ५ चे पोलीस पथकाने कसोशीने तपास करुन फिर्यादी, साक्षीदार तसेच आजूबाजूचे स्थानिक लोकांकडे कसून चौकशी केल्यानंतर **पोउप-नि राहुल कोळी, पोहवा/७१८ बनसुडे, पोहवा/९७६ बहीरट, पोना १२९८ गोनटे, पोशि/१३०५ खेडकर, पोशि १३०३ इघारे, पोशि/४९९ माने, पोशि/२५७१ गुट्टे** या पोलीस पथकाला अशी माहिती मिळाली की, मयत कृष्णा कैलास शेळके याचा खुन करुन गुन्हा घडले ठिकाणावरुन तळ्याच्या दिशेने पळुन गेलेल्या चार अनोळखी इसमांपैकी एक इसम तळेगांव दाभाडे येथे राहणारा रेकॉर्डवरील आरोपी नामे **धिरज ऊर्फ मोठा बांडी अनिल गरुड** हा असून तो घटनेनंतर पसार झाला आहे व सदर आरोपीचा गुन्ह्यात सहभाग आहे. गुन्हे शाखा युनिट ५ चे पोलीस पथकाने नमुद आरोपीचा कसोशीने शोध घेवून त्यास तळेगाव स्टेशन परिसरातून ताब्यात घेतले.

सदर आरोपीकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपी नामे **धिरज ऊर्फ मोठा बांडी अनिल गरुड वय -१९ वर्षे रा. संस्कृती अपार्टमेंट, राव कॉलनी तळेगाव दाभाडे ता.मावळ जि. पुणे व त्याचे इतर ०३ साथीदार हे** सर्व एकत्र दि.०५/११/२०२३ रोजी रात्रीचे ०८:०० वा.चे सुमारास तळेगाव दाभाडे येथील जुना मुंबई पुणे हायवे रोडने पायी चालत फिरत असताना निलया सोसायटी जवळील भंगाराच्या दुकाना जवळ आले असता त्यांची तेथे रस्त्याचे कडेला थांबलेल्या मयत इसम कृष्णा शेळके व त्याचे दोन मित्रासोबत किरकोळ कारणावरुन भांडण झाले सदर भांडणात मयत कृष्णा कैलास शेळके याने वरिल आरोपीपैकी एकाच्या कानाखाली मारली त्यामुळे आरोपी धिरज गरुड व त्याचे ०३ साथीदारांनी चिडून जावून मयत कृष्णा कैलास शेळके यास हाताने व लाथा बुक्याने मारहाण करुन डोक्यावर, छातीवर, पाठीत व डोक्यावर चाकुने वार करुन त्यास जागीच ठार केले व घटनास्थळावरुन पळून गेले. गुन्हे शाखा, युनिट ५ कडून उर्वरित तीन आरोपींचा शोध चालु आहे.

**सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा.सह.पोलीस आयुक्त श्री संजय शिंदे, मा.अपर पोलीस आयुक्त श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त गुन्हे, श्रीमती स्वप्ना गोरे. सहा.पोलीस आयुक्त गुन्हे, श्री. सतिश माने, यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे व सुचना प्रमाणे श्री. अजित लकडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ५, यांचे मार्गदर्शनाखाली पोउप-नि राहुल कोळी, पोहवा/७१८ बनसुडे, पोहवा/८५८ राठोड, पोहवा/९७६ बहीरट, पोहवा/१६०८ मालुसरे, पोहवा/१५५५ सुर्यवंशी, पोहवा/१००९ ठाकरे, पोना/१९०० शेख, पोना/१२९८ गोनटे, पोशि/२५७१ गुट्टे, पोशि/१३०३ इघारे, पोशि/१३०५ खेडकर, पोशि/४९९ माने, पोशि/१८९८ गाडेकर, पोशि/२०१७ भोसले, पोशि/२१९२ ब्रम्हांदे, तसेच तांत्रीक विश्लेषण शाखेकडील पोहवा/६६९ नागेश माळी व पोशि/२३६६ हुलगे यांनी केली आहे.**

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**